# शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी

थिबा प्रासाद नजिक, रत्नागिरी – ४१५ ६१२. (महाराष्ट्र)

दूरध्वनी : ०२३५२–२२२२०३ / २२२४३५ फॅक्स : ०२३५२–२२२४३५

ई–मेल : principal_gpr@rediffmail.com वेबसाईट : www.gpratnagiri.org.in


जा.क्र.शातंर/विवि/२०२१/933 दिनांक : ३०.०३.२०२१

## विद्यार्थ्यांना सुचना

**संदर्भ : No.MSBTE/D-40/Academic Calendar/82/2020/0107 Dt.08/12/2020.**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संस्था क्र.००१३ तसेच १५९८ मधील सर्व नियमित व बहिस्थ विद्यार्थ्यांना सुचित करण्यांत येते की, उपरोक्त संदर्भिय महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार दिनांक१७/०४/२०२१ पासून उन्हाळी परीक्षा, २०२१ करिता परीक्षेचे अर्ज करण्यांसाठी एमएसबीटीईच्या वेबसाईटवर लिंक सुरु होत असून, सदर ऑनलाईन भरलेले परीक्षा अर्ज व फी खालील वेळापत्रकाप्रमाणे कार्यालयात स्विकारले जातील.

| अ.क्र. | शाखा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| ०१ | संगणक अभियांत्रिकी | १७/०४/२०२१ | सकाळी १२.०० पासून दुपारी ०१.३० पर्यंत |
| ०२ | औषधनिर्माणशास्त्र | १८/०४/२०२१* | सकाळी ११.०० पासून दुपारी ०१.०० पर्यंत |
| ०३ | यंत्र अभियांत्रिकी | १९/०४/२०२१ | सकाळी ११.०० पासून दुपारी ०१.०० पर्यंत |
| ०४ | स्थापत्य अभियांत्रिकी | २०/०४/२०२१ | सकाळी ११.०० पासून दुपारी ०१.०० पर्यंत |
| ०५ | अणुविद्युत अभियांत्रिकी | २१/०४/२०२१ | सकाळी ११.०० पासून दुपारी ०१.०० पर्यंत |
| ०६ | विद्युत अभियांत्रिकी | २२/०४/२०२१ | सकाळी ११.०० पासून दुपारी ०१.०० पर्यंत |

*रविवारी सुट्टीच्या दिवशी कार्यालय सुरु राहिल.

**परीक्षा अर्ज भरताना इतर महत्वाच्या सुचना खालील प्रमाणे -**

१. प्रती सत्र **रु.६००/-** परीक्षा फी (Normal Fee) राहिल.
२. प्रथम तसेच थेट व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांना **पासवर्ड एकवेळ विभागस्तरावर उपलब्ध** करुन दिले जातील.
३. विद्यार्थ्यांचे स्वतःचे एमएसबीटीईचे लॉगीन आयडी व **पासवर्ड विद्यार्थ्यांनी पदविका अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत स्वतः जपून ठेवणे** आवश्यक आहे. प्रत्येक परीक्षेवेळी सदर पासवर्ड उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत.
४. विद्यार्थ्यांने स्वतःचा **पासवर्ड कोणालाही शेअर करु नयेत**. विद्यार्थ्यांच्या पासवर्डचा कोणी गैरवापर केल्यास संस्था जबाबदार राहणार नाही.
५. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या लॉगीन आयडीव्दारे परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांने परीक्षेकरिता आवश्यक असलेले **ईमेल आयडी तसेच मोबाईल नंबर व्यवस्थित भरला** आहे किंवा कसे? याबाबत खात्री करावी व नंतरच परीक्षा अर्ज भरावा.
६. विद्यार्थ्यांकडुन चुकीचा मेल आयडी किंवा मोबाईल क्रमांक टाकला गेल्यास व विद्यार्थी परीक्षेपासुन वंचित राहिल्यास संस्था जबाबदार राहणार नाही.



P.T.O

७. विद्यार्थ्यांने परीक्षा अर्ज कार्यालयात सादर करण्यांपुर्वी परीक्षा अर्जातील सर्व विषय तसेच इतर माहिती व्यवस्थित भरली आहे किंवा कसे? याबाबत खात्री करावी व नंतरच कार्यालयात अर्ज सादर करावा.

८. कार्यालयात परीक्षा अर्ज सादर करताना सदर परीक्षा **अर्जावर ठिकाण, विद्यार्थ्यांची सही, मोबाईल क्रमांक तसेच मेल आयडी स्वच्छ हस्ताक्षरात लिहिणे** आवश्यक आहे.

९. तृतिय वर्षांतील सर्व विद्यार्थ्यांनी सहाव्या / अंतिम सत्रातील अर्ज भरताना जो इलेक्टिव्ह विषय निवडला आहे, तोच **इलेक्टिव्ह विषय परीक्षा अर्जामध्ये व्यवस्थित भरावा**. याबाबत नंतर कोणतिही चुकीची दुरुस्ती संस्थास्तरावर जाणार नाही. तसेच होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील, याची नोंद घेण्यांत यावी.

१०. ज्या विद्यार्थ्यांनी जुण्या कोणत्याही स्किम मधून 'I' Scheme मध्ये दुसऱ्या सत्रामध्ये पुर्नःप्रवेश घेतलेला आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा, २०२१ करिता परीक्षा अर्ज भरण्यांपुर्वी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून स्किम बदलाचे **पात्रता प्रमाणपत्र घेणे हे संबंधित विद्यार्थ्यांना अनिवार्य** आहे. याकरिता संबंधित विद्यार्थ्यांने दिनांक १७/०४/२०२१ रोजी कार्यालयात पात्रता शुल्क रु.२००/- सह उपस्थित रहावे. पात्रता प्रमाणपत्र मिळालेनंतरच सदर विद्यार्थ्यांना परीक्षेचा अर्ज भरता येईल.

११. उन्हाळी परीक्षा, २०२१ चे परीक्षा अर्ज कार्यालयात सादर केल्यानंतर संस्था तसेच मंडळ स्तरावर कर्न्फम केले आहेत किंवा कसे? याबाबत विद्यार्थ्यांने स्वतः खात्री करावी. **तसेच याबाबत काही शंका असल्यास तात्काळ दिनांक २२/०४/२०२१ पर्यंत कार्यालयात संपर्क साधावा.**

**१२.** सदर कर्न्फम केलेल्या परीक्षा अर्जाची एक प्रत ही परीक्षेचे हॉल तिकिट येईपर्यंत जपून ठेवावी.

**१३. सर्व विद्यार्थ्यांना याव्दारे सुचित करण्यांत येते की, परीक्षा अर्ज व फी भरण्यांचे वेळापत्रकाची काटेकोरपणे अंम्मलबजावणी केली जाईल.**

१४. कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीमुळे सर्व विद्यार्थ्यांनी योग्य ती खबरदारी घेऊन परीक्षा अर्ज उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे सादर करणेसाठी सुचनांचे पालन करुन उपस्थित रहावे.

१५. उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे या संस्थेमध्ये परीक्षा अर्ज व फी न भरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्रपणे अतिरिक्त परीक्षा फी (Late Fee) सह चे परीक्षा अर्ज दिनांक २५/०४/२०२१ नंतर स्विकारले जातील.

**प्राचार्य**
**शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी**

**प्रति :** मुख्य नोटीस बोर्ड / मुलांचे वसतीगृह / मुलींचे वसतीगृह / वि.प्र. संगणक (संस्थेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेसाठी)

**प्रत :** १) सर्व विभाग प्रमुख, (संस्था क्र. ००१३ तसेच १५९८) शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी
२) रोखा विभाग, शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.